दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२५ मे २०२५


**मराठी सुविचार**

दिवसातील सर्वात आनंददायक क्षण म्हणजे पहाटेची वेळ. म्हणून ब्रह्ममुहूर्तावर उठणे चांगले

## थोडक्यात

## लोणार तालुक्यात विजेचा लपंडाव !

### महावितरणच्या विरोधात उबाठा आक्रमक...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, लोणार :** विजेचा लपंडाव बंद करून प्रवाह सुरळीत करा नसता कार्यालयास ताळे ठोकू याचे परिणाम आपणास भोगावे लागेल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने डॉ. गोपाल बछिरे, गजानन जाधव सर यांनी महावितरण कंपनीच्या अभियंत्यास देण्यात आला. लोणार शहर व ग्रामीण भागामध्ये एक महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू झाला आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे पंखे, कुलर, टीव्ही, मिक्सर, विजेचे दिवे, तसेच विजेचे उपकरण जळून खाक होत आहेत. यास जबाबदार कोण? एक तर संपूर्ण महिन्याचा वीज आकार, वीज भार, इतर सर्व शुल्क ग्राहकांवर लादता, त्याचबरोबर महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे वीज ग्राहकांचे अतोनात नुकसान होत आहे, याला सर्वस्व महावितरण कंपनी व त्या कंपनीने आपल्या सारखे बेजबाबदार अभियंता नियुक्ती केली. आपण स्वतः जबाबदार आहात आपणास ताकीद देण्यात येते विना विलंब त्वरित वीज प्रवाह सुरळीत करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या पावर हाउस कार्यालयास ताळे ठोकण्यात येईल,याची गांभीर्याने नोंद घ्यावी असा इशाराच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महावितरण कंपनीच्या अभियंताला देण्यात आला. याप्रसंगी शिवसेनाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, विभाग प्रमुख गोपाल मापारी, अल्पसंख्यांचे अशपाक खान, विभाग प्रमुख ज्ञानेश्वर दूधमोगरे, युवा सेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, ज्ञानेश्वर जाधव, वैभव जाधव, तानाजी मापारी, कैलास अंभोरे, महिला आघाडीच्या जिल्हा उपप्रमुख संजीवनी वाघ, तालुकाप्रमुख तारामती जायभाये यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## वैष्णवी प्रकरणाची पुनरावृत्ती...
## सासरच्या छळाला कंटाळून भक्तीनं दिला जीव



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नाशिक :** वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण ताजं असताना, याबद्दल समाजाच्या सगळ्याच स्तरांमधून संताप व्यक्त होत असताना नाशिकमध्येही तशीच घटना घडलेली आहे. नाशिकच्या गंगापूर परिसरात एका विवाहितेनं आत्महत्या केली आहे. सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेनं राहत्या घरीच गळफास घेऊन जीवन प्रवास थांबवला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पती आणि सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल केला.

आत्महत्येची घटना नाशिकच्या गंगापूर रोडवरील उच्चभ्रू वसाहतीत घडली आहे. भक्ती अथर्व गुजराथी असं आत्महत्या केलेल्या महिलेचं नाव आहे. त्यांचं वय ३७ वर्षे होतं. भक्ती यांचा अथर्व यांच्याशी ७ वर्षांपूर्वी प्रेम विवाह झाला होता. त्यांना ५ वर्षांचा एक मुलगादेखील आहे. लग्नानंतर सासरच्या लोकांकडून भक्ती यांचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जात होता, असा आरोप त्यांच्या वडिलांनी केला.

सासरी त्रास दिला जात असल्यानं भक्तीच्या कुटुंबियांनी तिला माहेरी आणलं होतं. पण अथर्वनं तिला पुन्हा सासरी नेलं. पण सासरच्या लोकांकडून सुरु असलेला त्रास कायम राहिला. या जाचाला कंटाळून भक्तीनं राहत्या घरात गळफास घेऊन आयुष्याचा शेवट केला. या घटनेनंतर भक्तीच्या आई, वडिलांनी गुजराथी कुटुंबाविरोधात पोलीस तक्रार नोंदवली. अथर्वसह त्याच्या कुटुंबावर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. विशेष म्हणजे वैष्णवी हगवणे प्रमाणेच भक्ती गुजराथीच्या शरीरावर जखमांच्या अनेक खुणा आढळून आल्या आहेत. त्यामुळे भक्ती यांनी आत्महत्या केली की त्यांची हत्या घडवून ती आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणी सखोल तपास करण्याची मागणी भक्तीच्या कुटुंबानं केली आहे. भक्तीच्या मुलाचा ताबा मिळावा यासाठीही तिचं कुटुंब आग्रही आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

वैष्णवी हगवणेच्या आत्महत्येनंतर हुंड्यासाठी होत असलेल्या छळाचा विषय ऐरणीवर आला आहे. पुण्याच्या हडपसरमधील दीपा पुजारीनंही सासरच्यांकडून होत असलेल्या छळाला कंटाळून जीव दिला. महिन्याभरापूर्वीच तिचा विवाह झाला होता. मनासारखा हुंडा न मिळाल्यानं, लग्नात मानपान न झाल्यानं सासरच्यांकडून तिचा छळ सुरु होता. त्याच छळाला कंटाळून दीपानं आयुष्य संपवलं.

# सावधान ! कोरोना रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू...

## मुंबई, पुणे पाठोपाट ठाण्यातही कोरोनाच्या रुग्णसंख्येत झापाट्याने वाढ...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, ठाणे :** जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूच्या नवीन व्हेरिएंटमुळे पुन्हा एकदा रुग्णसंख्या वाढू लागली आहे. त्यामुळे भारतातही सतर्कता वाढवण्यात आली असून, पुणे, मुंबई पाठोपाठ आता ठाण्यातही करोनाचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. याच पार्श्वभूमीवर ठाणे सिव्हिल रुग्णालयात ४० खाटांचे विशेष कक्ष तातडीने तयार करण्यात आला असून, यामध्ये रुग्णांना लागणाऱ्या सर्व वैद्यकीय यंत्रणा सुसज्ज ठेवल्या आहेत.

मुंबईत कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाल्यानंतर ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या तीन दिवसात कोरोनाचे १० रुग्ण आढळले असून त्यांच्यात कोरोनाची सौम्य लक्षणे असून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. दरम्यान, कोरोना रुग्णांच्या तपासणीसाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने तसेच सर्व रुग्णालयांनी सतर्क रहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. मत्र, संभाव्य वाढीचा अंदाज घेता जिल्हा आरोग्य प्रशासनाने युद्धपातळीवर तयारी सुरू केली आहे.



ठाणे सिव्हिल रुग्णालयात ४० खाटांचे विशेष कक्ष तातडीने तयार करण्यात आला आहे. हा कक्ष पूर्णपणे वातानुकूलित असून त्यामध्ये आवश्यक ते सर्व वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. डॉक्टर, नर्सेस आणि सहाय्यक कर्मचारी यांची स्वतंत्र नियुक्तीही करण्यात आली आहे. याशिवाय, रुग्णांच्या चाचण्या, विलगीकरण आणि औषधोपचारासाठी स्वतंत्र सुविधा विकसित करण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली.

दरम्यान कळवा येथे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात देखील विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे.आतापर्यंत ठाण्यात कोरोनाचे १० रुग्ण आढळले असून त्यांच्यात कोरोनाची सौम्य लक्षणे आढळली आहेत. त्या सर्व रुग्णांवर घरीच उपचार करण्यात येत आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी चेतना नितील यांनी या बैठकीत दिली.

त्याचबरोबर, सर्व आरोग्य केंद्रात पुरेसा औषध साठा उपलब्ध असून तेथे टेस्टिंग कीटही आहेत, असेही त्यांनी सांगितले.कळव्याच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात कोरोनाच्या रुग्णांसाठी १९ खाटांचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. अनिरुद्ध माळगावकर यांनी दिली. आरटीपीसीआरची सुविधाही कळवा येथे उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

विशेष बाब म्हणजे देशात सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात आढळून आले असून ठाण्यात एका २१ वर्षीय कोरोनाबाधित रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. संबंधित रुग्णावर कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू होते. वसीम सय्यद, अशी मृताची ओळख असून तो ठाण्यातील मुंब्रा येथील रहिवासी होता.

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे डीन डॉ. राकेश बारोट यांनी सांगितले की, संबंधित रुग्णाला गुरुवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान अचानक त्याची तब्येत बिघडल्याने त्याला आयसीयूमध्ये हलवून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. शुक्रवारी हा रुग्ण कोरोनाबाधित असल्याचे वैद्यकीय अहवालातून निष्पन्न झाले. त्यानंतर शनिवारी सकाळी सहा वाजताच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, हा रुग्ण मधुमेहाच्या आजाराने ग्रस्त होता. शवविच्छेदनानंतर कोरोनाच्या नियमांनुसार, रुग्णावर अंतिम संस्कारांसाठी मृतदेह त्याच्या कुटुंबियांना सोपवण्यात येईल. याबाबत फ्री प्रेस जर्नलने वृत्त दिले.

# अहिल्यानगरचे भूमिपुत्र संदिप गायकर यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** जिल्ह्याचे भूमिपुत्र वीर जवान संदीप पांडुरंग गायकर यांना दहशतवाद्यांविरोधात लढताना वीरमरण आलं. ते सैन्यदलाच्या मराठा बटालियनमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये सेवा बजावत होते.

त्यांच्या बलिदानानं संपूर्ण अकोले तालुका आणि अहिल्यानगर जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. शहीद जवान संदीप गायकर यांच्यावर शनिवारी सकाळी ब्राह्मणवाडा येथे लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वीर जवानास शेवटची मानवंदना देण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संदिप गायकर यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. आ. डॉ. किरण लहामटे,आ. अमोल खताळ, माजी आ. वैभव पिचड यांच्यासह हजारो नागरिकांनी साश्रू नयनांनी वीर जवानाला निरोप दिला. अहिल्यानगर जिल्ह्याच्या



**लष्करी इतमामात अंत्यसंस्कार**

त्यांचे पार्थिव गावात पोहोचल्यानंतर प्रथम संपूर्ण ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली. संदीप गायकर यांनी शिक्षण घेतलेल्या सह्याद्री विद्यालयाच्या प्रांगणात त्यांच्या अंत्यसंस्काराची व्यवस्था करण्यात आली होती. संदिप गायकर यांच्यावर लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. जवानाला अखेरचा निरोप देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. अंत्यसंस्कारावेळी शहीद संदिप गायकर अमर रहे च्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला. सैन्यदल आणि अहिल्यानगर पोलिस दलाच्या वतीने शहीद जवानास लष्करी मानवंदना देण्यात आली. संदिप गायकर यांना अखेरचा निरोप देताना अनेकांना अश्रू अनावर झाले होते.

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावचे संदीप पांडुरंग गायकर मागील सहा ते सात वर्षांपासून सैन्यदलातील मराठा बटालियनमध्ये कार्यरत होते. गुरुवारी पहाटे, जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड सेक्टरमध्ये सीमेवर कर्तव्य बजावत असलेल्या दहा जवानांच्या तुकडीवर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या हल्ल्यात देशासाठी लढताना संदीप गायकर यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. संदीप गायकर हे शिस्तबद्ध, कर्तव्यनिष्ठ आणि राष्ट्रप्रेमी सैनिक म्हणून ओळखले जात होते.

त्यांनी सैन्यात निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि धैर्याने सेवा बजावली. देशाच्या संरक्षणासाठी उभे असताना शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी लढा दिला. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या वीरमरणाची बातमी समजताच गावात शोककळा पसरली. वीर जवान संदीप पांडुरंग गायकर यांचं पार्थिव अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावी २३ मे रोजी आणण्यात आले होते.

# वयोवृध्द महिलेस मारहाण करुन चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** दिनांक २० मे, २०२५ रोजी पोलीस स्टेशन मुल हद्दीतील मौजा मोरवाही येथील रहिवासी श्रीमती ध्रुपताबाई प्रल्हाद रायपुरे वय ६५ वर्ष ही आपले राहते घरी झोपेत असतांना रात्रौ १.०० वा. सुमारास अज्ञात दोन इसम त्यांच्या घराचे मागच्या बाजुला रचुन ठेवलेल्या विटा बाजुला करुन घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादी वयोवृध्द महिलेस तोंडावर हाताबुक्क्यांनी व काठीने मारहाण करुन जखमी केले व तिचे गळयामध्ये असलेले ४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र किं.४०,०००/- रुपयाचा माल जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेले होते. यावरुन पोलीस स्टेशन मुल येथे अपराध क्रमांक २००/२०२५



कलम ३०९ (१), ३३३, ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता. सदर गुन्हयांचे गांभीर्य पाहता, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथील एक शोध पथक मुल परिसरात पाठवुन कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपासावरुन गुन्हयातील आरोपी (१) प्रनिकेत दिलीप शेन्डे वय २२ वर्ष, (२) तनिष्क ओम मंडलेकर वय १९ वर्ष दोन्ही रा. ताडाळा रोड वार्ड क्र.११ मुल यांना ताब्यात घेवुन बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी त्यांचा साथीदार नामे नयन रामटेके रा. मुल याचेसह मिळुन सदर गुन्हा केला असुन चोरीचा मंगळसुत्र मध्यप्रदेश राज्यातील नयनपुर येथे विकल्याचे सांगत असल्याने दोन्ही आरोपी पुढील तपासकामी पोलीस स्टेशन मुल चे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास मुल पोलीस करीत आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अमोल काचोरे स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांचे नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, सुनिल गौरकार, सफौ धनराज करकाडे, पोहवा सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनीकांत पुठ्ठावार, चेतन गज्जलावार, पोअं. प्रशांत नागोसे, प्रफुल्ल गारघाटे, किशोर वाकाटे, शेशांक बदामवार सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

# संपादकीय



## पर्जन्य पडावे आपुल्या स्वभावे

पर्जन्य पडावे आपुल्या स्वभावे।
आपल्या दैवे पिके भूमी।।

संतश्रेष्ठ तुकोबारायांनी या अभंगातून पावसाचा लहरीपणा आणि पाठोपाठ त्याची महतीही वर्णन करून ठेवलेली आहे. पाऊस पृथ्वीवरील प्रत्येक घटकाचे तन-मन फुलवणारा, चैतन्यदायी असतो. तो सुखावणारा, आनंदाचे गाणे घेऊन येणारा असतो. मनाला न्हाऊ घालणारा असतो. म्हणूनच की काय, पावसाळ्याच्या तोंडावर त्याची चाहूल लागली की 'येरे घना, येरे घना, न्हाऊ घाल माझ्या मना' अशा ओळी आपसूकच ओठांवर येतात. उन्हाचा ताप घटवणारा, आनंदाचे गाणे घेऊन येणारा हाच पाऊस सद्यस्थितीत तरी नाशिक आणि परिसरासाठी प्रचंड त्रासदायी आणि मनस्ताप वाढवणारा ठरतो आहे. चढत्या पाऱ्यापासून दिलासा मिळाल्याने अनेकांना तो हवाहवासा वाटू शकतो. परंतु, मागच्या दहा-बारा दिवसांपासून अकाली सरींनी मुक्काम ठोकल्याने जीवनमान प्रभावित झाले आहे. सकाळी प्रचंड उकाडा आणि दुपारनंतर गडगडाटी वर्दीसह अवकाळी धारा असा अनोखा 'पॅटर्न' त्याने निश्चित केल्याने प्रत्येक घटकाची धांदल उडते आहे. दिवसभरात सर्वच ऋतूंची 'याचि देही याचि डोळा' अनुभूती मिळत असल्याने अडचणी वाढत आहेत. गडगडाटी ढग आणि केव्हाही कडाडणारी वीज हृदयात धडकी भरवत आहे. नाशिक जिल्ह्यात सहा जणांचा बळी गेल्याने, अनेकांचे संसार उघड्यावर पडल्याने ही बिगरमोसमी आपत्ती अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आणणारीच ठरली आहे. वैशाख हा तसा शेतीसाठी अखेरचा हंगाम असल्याने या टप्प्यात शेतात पिकांचे प्रमाण अल्पच असते. परंतु, मे महिन्यात अंमळ लवकरच पावसाने मारा केल्याने शेतशिवारातील आवरासावरीला उसंत मिळालीच नाही. हवामान विभागाने इशारा देऊनही बळीराजा गाफील राहिला खरा; परंतु सुरुवातीला मिळालेला इशारा केवळ दोनच दिवसांपुरता होता, असेही सांगितले जाते. त्यानंतर पावसाचे दिवस वाढत राहिले.

एकट्या नाशिक जिल्ह्यात कांदा, आंबा, डाळिंब, मका यांसह पाच हजार हेक्टरवरील पिके अवकाळी सरींनी भुईसपाट केली. पेठ, कळवण, सुरगाणा, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यांत प्रचंड नासधूस झाली. सटाणा, चांदवड, मालेगाव, नाशिकसह इतरही तालुकेही शब्दश: धुवून निघाले. उत्तर महाराष्ट्रात तोंडाशी आलेल्या पंचवीस हजार हेक्टरवरील पिकांचे मातेरे झाल्याने शेतकरी हिरसमुसला. महिन्याच्या सरासरीच्या दीडशे टक्के पाऊस विभागात झाला. शेतीवर गुजराण असणाऱ्या दोन हजार गावांतील चाळीस हजार लोकांना आर्थिक फटका बसला. दीडशेहून अधिक जनावरे दगावली. जखमी झालेल्यांची गणतीच नाही. शेती आणि शेतकऱ्यांच्या इतरही चीजवस्तूंचे नुकसान झाले, ते वेगळेच! सरकारी पातळीवरून पंचनामे आणि इतर तांत्रिक सोपस्कार सुरू असले तरी गतअनुभव लक्षात घेता, या काळातील नुकसानीची भरपाई मिळणे कठीणच! नुकसानग्रस्त ती मागणार नाहीत आणि कोणी मागितल्यास सरकार ती देणार नाही, अशीच अवस्था! नागरी भागालाही या पावसाने जबरदस्त तडाखा दिला. वादळी वाऱ्यामुळे हजाराहून अधिक वृक्षांची हानी झाली. शेकडो घरांची पडझड झाली. अनेकांची छपरे उडाली.

खोदलेल्या रस्त्यांवरून पाण्याचे पाट वाहिल्याने जूनअखेरीस उघडे पडणारे पितळ यंदा मेच्या दुसऱ्या आठवड्यातच दिसून आले. नाशिक शहरातील २०९ 'ब्लॅक स्पॉट'वर पाणी तुंबले. काही ठिकाणांवर तीन-चार फुटांपर्यंत तळे साचले. पाठोपाठ एरवी जुलैत अवतरणारे रस्त्यांवरील खड्डेसुद्धा दोन महिने आधीच प्रकट झाले. (मागील दोन-तीन वर्षांपासून ऐन पावसाळ्याच्या तोंडीच खोदकाम होत असल्याने खड्डे तर नाशिकच्या पाचवीलाच पुजलेले असल्याची स्थिती आहे.) महापालिकेने १५ मेनंतर खोदकामाला मनाई करूनही निर्ढावलेल्या ठेकेदारांनी गॅस पाइपलाइनच्या नावाने काम सुरूच ठेवत नाशिककरांचा मार्ग खडतर केला. तसे कारस्थान सुरूच ठेवले. यंत्रणांकडून नालेसफाई झालीच नसल्याने तिची पोलखोल सध्या तरी टळू शकली. तरीही गोदाघाटावरील असंख्य चेंबर्स अक्षरश: पाच फुटांपर्यंत कारंजाप्रमाणे उसळली. आता आणखी पुढील दोन आठवड्यांसाठी पावसाचा इशारा मिळाल्याने महापालिकेला उशिराचे शहाणपण सुचले. नालेसफाईच्या कामांची एकच घाई सुरू झाली. आपत्ती व्यवस्थापनाची बोंब मात्र कायम आहे.

# पैश्यापुढे आता माणुसकी हारली....



सहजचं फेसबुक बघत होतो. अचानक डोळ्या पुढे मन हेलावून टाकणारा व्हिडीओ आला. लग्न, विवाह, रेशिमगाठी ह्या स्वर्गातचं जुळतात. आपण मात्र नाममात्र असतो. असे वडील धाऱ्याकडून ऐकलं आहे. कदाचित ही बाब बदलत्या युगामध्ये मनाला तितकीशी पटत नाही.

लग्न म्हटलं की, मुलगा असो वा मुलगी आपला जोडीदार कसा असावा हा विचार करून अंदाज बांधत असतात. स्वप्नातील राज कुमार, राजकुमारी प्रमाणे आपलंही आयुष्य, स्वप्न, सहवास, अभासी दुनिया, सुखी संसारा साठी लागणाऱ्या सर्व बाबी मी राजकुमारा प्रमाणे प्रत्यक्षात उतरवण्या साठीच, सत्यात आणण्याचा प्रयत्न करत असते यासाठी तिचे आई - वडील् ही त्याला - तिला मदत करत असतात.' मेरे सपनों की रानी, कब आयेगी तू . अशी वाट पाहण्या मध्ये विचारा मध्ये,गुंग असणार्यासाठी लग्न ही बाब सुख देणारी आहे.

आपल्या कडे बऱ्याचं गोष्टीना बंदी आहे. पण ते प्रत्यक्षात चालू आहे बंदी फक्त नावालाच. अशी अनेक उदाहरणे देता येतील. यामध्ये प्रामुख्याने गुटखाबंदी, दारूबंदी, हुंडाबंदी, असुन सुद्धा हे संगळ मिळतं. लोकशाहीमधील नागरिक सत्य परिस्थिती वर बोलत नाहीत. हे वास्तव सत्य आपण डोळ्याने पाहतो.

लग्न ठरलं म्हटलं की, सर्वच गोष्टी ची जुळवा जुळव वधू पित्याला करावी लागते. वराला ठरलेली वरदक्षिणा देण्यापासून ते संसार उपयोगी साहीत्य जमा करण्यापर्यंत. शिक्षण घेतलेल्या मुली असो, नौकरी वाल्या असो की, डिग्री वाल्या असो, सर्वामध्ये वरदक्षिणा आहे. पण या बाबीला कोकण प्रांत मात्र अपवाद आहे. तिथं वरदक्षिणा मागितली जात नाही, दिलीही जात नाही. हे विशेष.

वरदक्षिणे मध्ये सोनं, चांदी, गाडी - बंगला या वस्तू शिवाय पैश्याची मागणी केली जाते. ती पूर्ण करण्यासाठी वधू पित्याची मात्र बरिचं तारांबळ उडते. आपल्या काळजाचा तुकडा द्यायचा, लहान पणापासून तिचा लाड, छंद, आवड जोपासायची आणि ह्या सर्व बाबी पूर्ण करून दुसऱ्या मुलाच्या हातात आपल्या मुलीचा हात द्यायचा .. हा विचार काळीज पिळवटून टाकणारा आहे. तरीपण काळजावर दगड ठेवून ही प्रथा चालवली जाते आपल्या कडे .....!

लग्नातील सर्व प्रथा, चालीरिती, पूर्ण करून लग्नाचा दिवस उजाडतो. नवरी, आई वडील, आप्तेष्ठ पाहणे मंडळीची वाट पाहतात. नवरीला आपली सुखी संसाराची स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आनंद गगनात मावत नाही. आई - वडील ही आपले कर्तव्य पार पाडणार असल्याचा आनंद, मुलगी सुखी होणार म्हणून सर्व कुलदैवताच्या पाया पडून तयार झालेली असतात. या सर्व बाबी परिस्थितीचा विचार न करता आई - वडील पूर्ण करत असतात.

वऱ्हाडी मंडळीची वाट पाहतात. लग्नाची वेळ (मुहर्त ) दुपारचा असतो. दुपार होण्यासाठी थोडाच वेळ शिल्लक असतो. पाहूणे आले नाहीत या चिंते मध्ये सर्वजण बुडालेले असतात. दारा मध्ये टाकलेला मांडव सुना - सुना वाटतो. सनई चौघड्या चा आवाज स्वागत करण्यासाठी तयार असतो. स्वंयपाकी पदार्थ चवदार झालेत, पाहुणे हात चाटून पुसून खातील. असं स्वंयपाकी भेटेल त्याला सांगत सुटतो. वधू सर्व साज सृंगार करून राजकुमाराची डोळ्यात तेल घालून वाट पाहत असते. पण अचानक वाढलेली मागणी वधू पित्या कडून पूर्ण झालेली नाही .. म्हणून मनात वाईट विचार आणून 'गाडी दिली नाही लग्नात,

म्हणून वरात आलीच नाही दारात .

हा व्हिडीओ संपतो. सर्वांचा दिवस वाट पाहण्यात आणि विचारात जातो. मुलाकडील मंडळी एवढी क्रुर का झाली? मुलीचा विचार मुलाला एक वेळ आला नाही तर वेगळं पण मुलाच्या आई- वडीलांनांचे ही असे चक्रावणारे वर्तन का झाले? पाहूणे दारात मंडप टाकून वाट पाहत असतील हा विचार का केला नसेल ? मेरे सपनो की रानी कब आयेगी तु हा विचार करणारा का थांबला असेल ? राजा की आयेगी बारात, रंगीली होगी रात, सजन मै नाचूँगी असं आनंदान म्हणणारी त्यांना दिसत नसेल का? त्यांच्या डोळ्यापुढं त्याची मुलगी आली नसेल का? त्यांचा मेंदू ' माणुसकी.- असते. हे सांगत नसेल का ? असे असंख्य प्रश्न संवेदनशिल मनाला पडतात. वधू पित्याचं दुःखाने सर्व वातावरण दुःखी होते. तो बेहोश होवून जातो. नवरी मेकअप केलेली, सजलेली बेशुद्द होवून पडते. याला काय म्हणावे ?

सामाजिक कर्तव्य, भावना, देवदेवतांची भिती, सामाजिक जाणिव, आई- वडीलांचे त्यांच्यावरि ल झालेले संस्कार घेतलेले शिक्षण सर्वचं हारले की काय ? मनातील वाईट विचारां पुढे पण एवढे मात्र खरे की, पैश्यापुढे आता माणुसकी हारली


**एकनाथ पलमटे (भाऊ)**
**जिल्हाध्यक्ष, लसाकम**
**लातूर**


# मातृभाषाच ज्ञान देते !




गावोगाव शाळांमध्ये प्रवेशासाठी सर्वेक्षण करताना अनेक सुशिक्षित पालक असं ठामपणे सांगतात ` आम्ही आमचं मूल इंग्रजी माध्यमातच घालणार आहोत. त्यांचा आत्मविश्वास पाहिला की क्षणभर वाटतं, आपण शाळेची माहिती देण्याबरोबरच एक वेगळी लढाईही लढतो आहोत ` ती म्हणजे मातृभाषेचं मूल्य पटवून देण्याची लढाई.

**मी त्या वेळी एक साधं पण प्रभावी उदाहरण देतो :** समजा तुम्हाला तुमच्या मुलाला सायकल शिकवायची आहे. आणि तुम्ही त्याला इंग्रजीत सूचना द्यायला लागलात – केश्रव िंहश हरपवश्रश िींॲरळसहीं, ज्ञशशिशिवरश्रळपस, लरश्ररपलश ॅींऑशश्रष ! – तर तो शिकेल का? लगेच उत्तर येतं – छे! कसं शिकेल? मग मी म्हणतो, जर तुम्ही त्याला मातृभाषेत – 'हँडल सरळ पकड!', 'पेडल मार!', 'तोल जाऊ देऊ नको!' – अशा सूचना दिल्या, तर तो लवकर शिकेल. हे ऐकून अनेक पालक थोडेसे थांबतात, विचार करतात. परंतु तरीही, त्यांच्या मनात एक खोल भीती असते मराठी माध्यमात शिकल्यास आमचं मूल स्पर्धेत मागे पडेल.

२० मे रोजी महान खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचं निधन झालं. त्यांचं बालपण उत्तर भारतात गेलं, आणि दहावीपर्यंतचं शिक्षण त्यांनी हिंदी माध्यमातून घेतलं. ते एका मुलाखतीत म्हणाले होते – हिंदी माध्यमामुळे मला कमी दर्जाचं शिक्षण मिळालं असं अजिबात वाटत नाही. चांगले शिक्षक असतील, तर सर्व व्यवस्थित होतं. पण आज आपल्याकडे परिस्थिती अशी की नवीन मराठी शाळा उघडण्यासाठी फार त्रास होतो!

मुलांना इंग्रजी माध्यमात टाकल्यावर त्यांना एकाच वेळी नवीन भाषा आणि नवीन ज्ञान शिकावं लागतं. ही दुहेरी कसरत सर्वच मुलांना शक्य नसते. काही बुद्धिमान मुले त्यातून मार्ग काढतात, पण इतर मुले मात्र गोंधळतात, आत्मविश्वास गमावतात, आणि हळूहळू शिकण्यापासून दुरावतात.

या इंग्रजी वर्चस्वाची पाळंमुळं १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉलेने घातलेल्या शिक्षण कायद्यात आहेत. त्याचं उद्दिष्ट होतं – भारतीयांनी इंग्रजीतून शिक्षण घेऊन ब्रिटिश सत्तेचे आज्ञाधारक नोकर बनावं. आजही आपण त्याच मानसिकतेचे वारसदार आहोत, हे दुर्दैव आहे.

चीन, जपान, दक्षिण कोरिया या देशांमध्ये मातृभाषेतच शिक्षण दिलं जातं. तिथले नागरिक जगभरात यश मिळवतात. याउलट, आपल्याकडे विद्यार्थी तीन-तीन भाषा शिकण्यात वेळ घालवतात. या देशातील तरुणांप्रमाणे जर हाच वेळ त्यांनी विज्ञान, गणित, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासात घातला, तर आपली तरुण पिढी खूप पुढे जाऊ शकेल.

आजच्या डिजिटल युगात भाषेची बंधनं आता तंत्रज्ञानाने हटवली आहेत. मोबाईलमध्ये भाषांतराचं तंत्रज्ञान आहे. इंग्रजी, फ्रेंच, कोरियन कोणतीही भाषा समोरच्याने वापरली, तरी आपल्याला तिचं मातृभाषेत रूपांतर मिळू शकतं. त्यामुळे ज्ञान मिळवण्यासाठी इंग्रजीच हवी, हे आता कालबाह्य होत चाललेलं मत आहे.

म्हणूनच, ज्ञानाच्या पहिल्या पायऱ्या मुलांच्या मनाजवळच्या, त्यांना समजणाऱ्या भाषेत म्हणजेच मातृभाषेत असल्या पाहिजेत. कारण केवळ मातृभाषाच आपल्या मुलांचं भावविश्व, विचारशक्ती, आणि कुतूहलाला योग्य दिशा देऊ शकते.

मुलांना इंग्रजी शिकवाच, पण त्यांच्या विचारांची बीजं मातृभाषेतच पेरली गेली पाहिजेत!


**-किशोर जाधव सोलापूर**
**मो. नं. ९९२२८८२५४१**


## बदलले ऋतूचक्र

ऋतू कोणता आहे काही कळेना
उन्हाळ्यात पाऊस काही थांबेना
विजांचा कडकडाट थैमान वाऱ्याचे
दगावली मुकी जनावरे अन् माणसे

गरीबांच्या लग्नाचा फज्जा झाला
लग्नाच्या वेळी मंडप उडून गेला
चिखलाने सगळीकडे राडा झाला
नवरीच्या बापाने हंबरडा फोडला


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


उन्हाळ्यात पाऊस धो धो पडतो
पेरणीच्या वेळी गुंगारा मारतो
पावसाळ्यात मग कडक उन्हाळा
गायब झाला बघा थंडीचा हिवाळा

बदलले ऋतूचक्र विचार करा थोडा
माणसाने पर्यावरणाचा घात केला
जागोजागी साचला विषारी कचरा
सर्वत्र दिसतो प्लॅस्टिकचा पसारा

कारखाने सोडती वायू विषारी
रसायनांचा वापर जणू पिचकारी
सगळ्या नद्या प्रदूषित झाल्या
मानव जातीला शाप देऊन गेल्या

माणसांनो आतातरी शहाणे व्हा
प्रदूषणाला थोडे नियंत्रित ठेवा
पर्यावरणाला जीवापाड जपू या
ऋतुचक्राला सुरक्षित ठेवू या


**- बबन दामोदर गुळवे**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**


# वृक्षारोपण मोहिमेसाठी मनपा, शाळा, कॉलेज, सामाजिक व स्वयंसेवी संस्थांची बैठक



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, पनवेल :** 'माझी वसुंधरा' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगर पालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील विविध जागा, रस्ते दुभाजक तसेच इतर शासकीय जागांवरती वृक्षारोपण मोहीम राबविण्याच्या अनुषंगाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालयात मनपा कार्यक्षेत्रातील विविध शाळा, महाविद्यालये, एनएसएस विभाग शिक्षक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांची नियोजन बैठक अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात आयोजित करण्यात आली.

या बैठकीस उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त अभिषेक पराडकर, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, महापालिका कार्यक्षेत्रातील वीस हून अधिक विविध सामाजिक संस्था व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात 'माझी वसुंधरा' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने मोकळ्या जागा, रस्ते दुभाजक तसेच इतर शासकीय जागांवरती व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्याच्या दृष्टीने महापालिकेने वृक्ष लागवड समितीची स्थापना केली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील पर्यावरण संवर्धनासाठी व रक्षणासाठी शहरातील सर्व भागधारकांनी वृक्षारोपण संकल्प आणि प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. यासाठी महापालिकेच्या वृक्ष लागवड समितीच्या वतीने आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल शहरातील शाळा, महाविद्यालये प्रतिनिधी, एनएसएस विभाग शिक्षक, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था यांची बैठक घेण्यात आली. यावेळी अतिरीक्त आयुक्त शेटे यांनी उपस्थित प्रतिनिधींना महापालिकेच्या व्यापक वृक्षारोपण मोहिमेमध्ये सर्वांचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगितले. या मोहिमेमध्ये सर्वांनी सहभागी होण्याबाबत विनंती केली. तसेच सामाजिक संस्थानी, स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन वृक्ष लागवड केल्यानंतर याचे दायित्व स्वीकारावे. जेणे करून रोपण केलेल्या झाडांची व्यवस्थितरित्या वाढ होईल.

यासाठी सामाजिक संस्थांना लागणारी सर्व सहकार्य महापालिकेच्या वतीने करण्यात येणार असल्याचे अतिरीक्त आयुक्तांनी सांगितले. महापालिकेच्या या प्रस्तावास उपस्थित सर्व शाळा प्रतिनिधींनी, सामाजिक संस्थानी, स्वयंसेवी संस्थांनी एकमताने होकार दिला. तसेच महापालिकेस सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. ही मोहिम यशस्वीपणे राबविण्यासाठी उपस्थितांनी देखील आपल्या सुचना सांगितल्या. या सर्व सूचनांचे स्वागत करून आतिरिक्त आयुक्तांनी महापालिकेच्या वृक्षारोपण मोहिमेत सहभागी झाल्याबद्दल सर्व सामाजिक संस्थांचे व स्वयंसेवी संस्थांचे आभार मानले.


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कृषी विभाग ॲक्शन मोडवर...

### विनापरवाना सेंद्रिय खते विकणाऱ्या टेम्पोसह १४ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : आकाश जयस्वाल**

**दि.२३, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील मोजे शिवनी येथे अनधिकृत रित्या विनापरवाना गावोगावी जाऊन सेंद्रिय व इतर खते विकत असल्याची गुप्त माहितीकृषी विभागास मिळाली त्यानुसार कृषी विभाग यांनी सापळा रचून सदरील खते व गाडी पकडून पोलीस स्टेशन इस्लापूर तालुका किनवट येथे जमा करून सदरील कंपनीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला सदरील गुन्हा माननीय जिल्हाधिकारी राहुल कर्डिले साहेब, विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर साहेब, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत साहेब, कृषी विकास अधिकारी डॉक्टर निलकुमार येतवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अधिकारी पंचायत समिती शिवराम मुंडे यांनी गुन्हा दाखल केला यावेळी जिल्हा मोहिम अधिकारी सचिन कपाळे, तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक अमोल पेकम यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी सहकार्य केले सदर गुन्हामध्ये १४ लाख ६४ हजार रकमेच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला.

कृषी विभागामार्फत असे आवाहन करण्यात येते की जिल्ह्यामध्ये कुठेही विनापरवाना अनधिकृत खते बियाणे विक्री होत असल्यास तात्काळ कृषी विभागाकडे संपर्क साधावा व तसेच कोणीही अशा प्रकारचे खते बियाणे विनापरवाना असेल तर खरेदी करू नये.

## ‘चंद्रपूर मनपा’ला मिळाले ३ नवीन टँकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** स्थानिक आमदार विकास निधीअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या ३ टँकरचे आ.किशोर जोरगेवार यांच्या हस्ते गुरुवारी फित कापून लोकार्पण करण्यात आले. ३ टँकरपैकी १ टँकर १ हजार लिटर क्षमतेचा असून, उर्वरीत २ ते ४ हजार लिटर क्षमतेचे आहे. पाणीपुरवठा करण्यास मनपाचे स्वत:चे ८ टँकर असून, यात तीन टँकरची भर पडल्याने मनपाकडे एकूण ११ टँकर झाले आहेत. पाण्याची टंचाई बघता ६ खाजगी टँकरने सुध्दा पाणीपुरवठा करण्यात येतो. सातत्याने वाढणारे उष्णतामानाने पिण्याच्या पाण्यासह उतारा घालविण्याकरीता कुलरचा दैनंदिन वापर केला जातो. अशा परिस्थितीत शहरवासियांकडून पाण्याच्या वापरात लक्षणीय वाढ होते.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, उपायुक्त संदिप चिद्रावार, शहर अभियंता रवींद्र हजारे, उपअभियंता रवींद्र कळंबे, चैतन्य चोरे, माजी नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, देवानंद वाढई तसेच मनपाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## अवकाळी पाऊस सुखावणारा... रानभाज्यांनी सजली शहरे....



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२४, ठाणे :** महाराष्ट्रात सर्वत्रच अवकाळी पावसाने हजेरी लावली असून मे महिन्यात वाढलेल्या तापमानाचा पारा बहुअंशी कमी होण्यास मदत झाली आहे. रखरखत्या मे महिन्यात नदी,नाले कोरडे तर माळरान ओसाड झालेले असते, मात्र सर्वत्र पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे थेट मे महिन्यातच माळरानावर हिरवी शाल पसरली असून,नदी नालेही तुडुंब पाण्याने वाहू लागले आहेत,तर जून महिन्यात उगवणाऱ्या रान भाज्या अवकाळी पावसामुळे थेट मे महिन्यात उगवल्याने मुंबई, ठाणे शहरातील उपनगरात फोडशी (कुळू) टाकळा, अन्य रानभाज्या बाजारात येऊ लागल्याने मुंबई नजीक असलेल्या कर्जत, कसारा, मुरबाड, येथून आदिवासी भागातील शेतकरी महिला ताज्या रानभाज्या ठाणे,दादर, डोंबिवली, परिसरात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी घेऊन येत असल्याने शहरातील रानभाज्या खवय्यांना विविध प्रकारच्या रानभाज्या उपलब्ध झाल्या आहेत, ठाणे रेल्वे स्टेशन परिसरात कर्जतच्या आदिवासी भगिनी अंबि भगत, लक्ष्मी अंबे आणि त्यांच्या सहकारी महिला अथक परिश्रम घेऊन माळरानावरील फोडशी (कुळू) टाकळा अश्या विविध रानभाज्या घेऊन ठाणे परिसरात विक्री करून आपला उदरनिर्वाह चालवत आहेत, रानभाज्या वनस्पतींमध्ये अनेक औषधी गुणधर्म आणि खनिजे असतात रानभाज्यांचे आपल्या जीवनात खूप महत्व आहे कारण त्या ऊर्जा आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात असा अनमोल रानमेवा ह्या आदिवासी महिला खूप मेहनतीने ह्या रानभाज्या आणि रानमेवा करवंद,अळू अन्य रानफळे शहरातील नागरिकांसाठी घेऊन येत असल्याने शहरातील नागरिकांनी ह्या आदिवासी महिलांकडून रानभाज्या,रानमेवा विकत घेऊन त्यांचा आर्थिक विकास होण्यास बळ द्यावे.

## पावसाळ्यापूर्वीच उजनी धरणाची पाणी पातळी वाढली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, सोलापूर :** पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगरसाठी जीवनदायीनी ठरलेल्या उजनी धरणाच्या पाणी पातळीमध्ये पावसाच्या पाण्यामुळे वाढ झाली आहे. गेल्या तीन दिवसात उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे गेल्या तीन दिवसात उजनी धरणाच्या पाणी पातळीमध्ये १ पूर्णांक ८९ टीएमसी इतकी वाढ झाल्याचं दिसून येत आहे.

सध्या उजनी धरणामध्ये एकूण ५३ पूर्णांक २५ टीएमसी इतका पाणीसाठा आहे. उजनी धरण हे आजच्या स्थितीला मायनस १९.पूर्णांक ४३ टक्के इतका आहे. मायनसम ध्ये असलेलं उजनी धरण प्लस मध्ये येण्यासाठी आणखी १० पूर्णांक ४१ टीएमसी इतकी पाण्याची आवश्यकता आहे.

## कावेरी चौक पुन्हा धोक्यात ! हातगाड्या हटवल्या, पण अपघाताची शक्यता कायम



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४, डोंबिवली (ठाणे) :** कावेरी चौकात २३ ऑक्टोबर २०२४ रोजी एका दुर्दैवी अपघातात एका बालकाचा मृत्यू झाल्यानंतर, महानगरपालिकेने तातडीने कारवाई करत चौकातील सर्व हातगाड्या हटवल्या. रस्त्यावर पार्क करण्यात आलेल्या ग्राहकांच्या वाहनांमुळे अपघात घडल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला होता.

मात्र काही महिन्यांतच त्या जागेवर एका राजकीय पक्षाच्या शाखेचे कार्यालय उभे राहिले आहे. ही उभारणी अधिकृत आहे की नाही, याविषयी स्थानिक नागरिकांमध्ये संभ्रम असून महानगरपालिकेने यावर खुलासा करणे आवश्यक आहे. या कार्यालयासमोरील वाहने मोठ्या सुपरमार्केट, मेडिकल, मिठाई दुकानांवर येणाऱ्या ग्राहकांची वाहने पुन्हा रस्त्यावरच पार्क केली जात आहेत. परिणामी, सकाळी व संध्याकाळी चौकात पुन्हा एकदा वाहतूककोंडी आणि अपघाताचा धोका वाढला आहे.

नागरिक प्रश्न उपस्थित करत आहेत की, हातगाड्यांवर त्वरीत कारवाई करणारी महानगरपालिका आता मोठ्या दुकानांवर व राजकीय कार्यालयावर का मूक आहे? नियम सर्वांसाठी समान असावेत, मग कारवाईसाठी निवडक दृष्टिकोन का?

जर पुन्हा अपघात झाला, तर रस्त्यावर पार्क केलेल्या वाहनांसाठी जबाबदार कोण असेल? प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आहे. आता तरी प्रशासनाने ठोस उपाययोजना करेल का?

## पनवेल मनपा आयुक्तांनी केली नालेसफाई कामाची पाहणी



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, पनवेल :** यावर्षी भरपूर पाऊसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवरती मान्सुनपूर्व पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील विविध नाल्यांच्या सफाईची पाहणी करून नुकताच कामकाजाचा आढावा आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. यावेळी स्वच्छता व घनकचरा विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त शीराम पवार, स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी व कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्या ११० किलोमीटर क्षेत्रात १०१ मोठे आणि २,१०४ छोटे नाले असून या महापालिका क्षेत्रात एकूण मोठे नाल्यांची संख्या ९७ इतकी आहे. यापैकी ६८ नाल्यांची सफाई पूर्ण झाली आहे. तर २,१०४ इतक्या छोट्या नाल्यांपैकी १ हजार २६२ नाल्यांची सफाई पूर्ण झालेली आहे. यावर्षी मान्सूनपूर्व पाऊस पण लवकर आल्याने नाले सफाईची सर्व कामे वेगाने पूर्ण होण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी या नाले सफाई पहाणी केली. या पहाणी दरम्यान खारघर मधील सेक्टर १२, महापौर बंगला जवळील नाले, उत्सव चौक, कळंबोली पंप हाऊस, कळंबोली चर्च जवळील नाला अशा सर्व नाल्यांची पहाणी आयुक्तांनी केली.

कळंबोली शहरात पालिकेचे विशेष लक्ष असून आपत्कालीन परिस्थितीसाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. या पहाणीवेळी आयुक्तांनी नाल्यातील काढलेल्या गाळाची योग्यरीत्या विल्हेवाट लावणे गरजेचे असल्याचे सांगून, उर्वरीत नालेसफाईची कामे वेगाने करण्याच्या सुचना संबधित विभागास दिल्या. आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी नालेसफाईचे सूक्ष्म नियोजन केले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून यांत्रिक पद्धतीने चारही प्रभागातील नालेसफाईचे काम अंतिम टप्प्यात आले आले असून, नालेसफाई बरोबरच शहरातील छोट्या- मोठ्या गटारीच्या साफसफाईचे कामही जोमाने सुरू आहे. सध्या नालेसफाईची कामे युध्द पातळीवर सुरू असून या कामासाठी सरासरी ७०० मनुष्यबळ, १५ जेसीबी, १५ पोखलँड, १७ डम्पर वापरण्यात येत आहेत. नालेसफाई कामामध्ये उचलण्यात आलेल्या गाळामध्ये मोठ्या प्रमाणात माती असल्याने पनवेल महानगरपालिका हद्दीतच मोकळ्या भूखंडावर पसरण्यात येत आहे.

## १० दिवसात घुग्घुस येथील लोखंडी पुलाचे काम सुरु करा

### आ.जोरगेवार यांचे निर्देश, जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** घुग्घुस रेल्वे सायडिंग वरील मागील दोन वर्षापासून बंद असलेल्या लोखंडी पुलाच्या काम ास येत्या १० दिवसात सुलुवात करावी, असे आ. किशोर जोरगेवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा, वेकोलि वणी एरियाचे अभियंता जमगाडे, रेल्वे अभियंता राजूरकर, घुग्घुस नगरपरिषदेचे दिनेश बावणे, आशिष मासिरकर, सोनल भरडकर, सन्नी खारकर, संजय भोंगळे, अनिल यादव, किरण पुरेली, राजू जगताप, सक्कील राईन, दिनेश बोरपे, संतोष नुन्ने, संजय तिवारी, मयुर कलवल, आदींची उपस्थिती होती. या पुलाच्या बंदमुळे सायडिंग कालनीतील नागरिकांना घुग्घुस शहरातील बाजारपेठेत ये-जा करताना मोठेया अडचणीचा सामना करावा लागत आहे. दुसरीकडे वणी रोडवरील पुलाचे कामही अपूर्ण असल्याने वाहतुक कोंडीचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे.

यावेळी बैठकीत बोलतांना आ. किशोर जोरगेवार म्हणाले, हा पुल घुग्घुसच्या जनतेसाठी अत्यंत महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांपासून महिलांपर्यंत, कामगारापासून वृध्दांपर्यंत सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या कामांची अधिक विलंब सहन केला जाणार नाही. १० दिवसात प्रत्यक्ष बांधकाम सुरु झाले पाहिजे अशा सूचना यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनीही प्रशासनाच्या वतीने तातडीने हालचाली करण्याचे आश्वासन दिले. लवकरच रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या समन्वयातून काम सुरु करण्यात येईल, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

## टाकळी ढोकेश्वर परिसरात दिवसभर अवकाळी संततधार...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वर परिसरात गेल्या १० दिवसापासून दिवसाआड कधी रोज अवकाळी पाऊस हजेरी लावत असल्यामुळे परिसरातील शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. काल शुक्रवारी पहाटेपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले. पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाल्याने प्रचंड उकाड्यापासून नागरिकांची तात्पुरती सुटका झाली.

अवकाळी पावसाने खरिपाच्या मशागतीच्या कामामध्ये खोडा घातला आहे. काल पहाटेपासूनच सुरू झालेल्या अवकाळी पावसाची संततधार सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होती. त्यानंतरही ढगाळ वातावरण असल्याने दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. रात्री अकरा वाजल्यापासून संततधार पावसाला सुरुवात झाल्याने सकाळी दुभत्या जनावरांच्या धारा काढण्यात व्यत्यय आला. पावसामुळे जनावरांचा गोठा, चारा व पशुखाद्य भिजल्याने पशुपालकांना व दूध उत्पादक शेतकऱ्यांना याचा फटका बसला.

> दरवर्षी साधारणपणे २५ मे ला रोहिणी नक्षत्राचे आगमन होते. रोहिणी बरसल्या तर त्या पाठोपाठ मृगही बरसतो आणि मृग ७ जूनला बरसला की, बळीराजा पेरणीला सुरूवात करतो. परंतु यंदा एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासूनच अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याला सुरूवात झाली. मे महिन्यात तर अवकाळीचा कहरच झाला आहे. वेळे आधीच पाऊस येऊन ठेपल्याने खरीप हंगामास उशीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पावसाच्या सरी बरसत असल्याने पावसातच जनावरांसाठी शेतातून चारा अणावा लागत आहे. त्यातच पावसामुळे रस्त्यावर चिखल झाल्याने मोठी कसरत दूध उत्पादकांना करावी लागली. दिवसभराच्या पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले. परिसरातील सर्व रस्त्यांवर पावसाच्या पाण्याने चिखल झाल्याने खड्डे पडले आहे.

सध्या खरिपासाठी जमिनीची मशागत करून रान तयार करण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. तर ज्या शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी रान तयार करण्यासाठी तयारी करत आहेत. परंतु अचानक आलेल्या व दिवसभर सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतीची कामे ठप्प झाली असून यामध्ये खोडा घालण्याचे काम अवकाळी पावसाने केल्याने बळीराजा चिंताग्रसत झाला आहे.

# देशातील पहिला वस्त्र कचरा पुनर्प्रक्रिया प्रकल्प नवी मुंबईत प्रथम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालय अंतर्गत टेक्सटाईल कमिटीच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने टाकाऊ वस्त्रावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर करण्याचा नाविन्यपूर्ण प्रकल्प देशात पहिल्यांदाच नवी मुंबईत सीबीडी बेलापूर येथे राबविण्यात येत आहे. या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशू सिन्हा यांनी भेट देत प्रकल्पाच्या प्रक्रियेची बारकाईने पाहणी करत समाधान व्यक्त केले.



याप्रसंगी त्यांच्या समवेत वस्त्रोद्योग विभागाचे उपसचिव श्रीकृष्ण पवार, वस्त्रोद्योग मंत्री महोदयांचे स्वीय सचिव प्रल्हाद रोडे तसेच नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, टिसरचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणपती व इतर अधिकारी उपस्थित होते.यावेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या भेटीदरम्यान हा अभिनव प्रकल्प सुरू करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रधान सचिव अंशू सिन्हा यांनी प्रशंसा केली.

या प्रकल्पाचे इतरही शहरांनी अनुकरण करावे असे त्यांनी सांगितले.या प्रकल्पाच्या माध्यमातून शाश्वत वस्त्र उपयोगासाठी चांगले काम केले जात असून याद्वारे महिलांनाही कुशल बनवून त्यांना रोजगार उपलब्ध होत असल्याबद्दल प्रधान सचिव अंशू सिन्हा यांनी हा प्रकल्प बहुउपयोगी असल्याचे मत व्यक्त केले. वस्त्र कचऱ्याच्या मोठया समस्येवर या प्रकल्पाद्वारे अत्यंत प्रभावी उपाययोजना केली जात असून यामध्ये टाकून दिलेली वस्त्रे आकर्षक स्वरुपात पुनर्निमित करुन वापरात येत आहेत. शाश्वततेसोबतच हा चक्रीकरणातून वस्त्र पुनर्वापराचा चांगला नमुना असल्याचे मत मांडत त्यांनी काम करणाऱ्या महिलांशी संवाद साधला व कचरा संकलन, वर्गीकरण, त्यावरील प्रक्रिया अशा सर्वच बाबींची कार्यप्रणाली जाणून घेतली.अंतर्गत विविध कार्यविभागांना भेटी देत प्रत्यक्ष कार्यवाहीची पाहणी केली. काम करतांना महिलांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद पाहून हे काम त्यांना आवडत असल्याचे बघून त्यांनी संतोष व्यक्त केला. यावेळी महिलांनीही त्यांना आम्हांला नवीन काही शिकण्याचा खूप आनंद मिळतो असे सांगितले. वस्त्र कच-याचे वर्गीकरण केल्यानंतर पुनर्प्रक्रिया करण्यापूर्वी त्याच्यापासून काय बनवायचे याचे डिझायनींग करण्यातील कल्पकतेचे त्यांनी विशेष कौतुक केले.

वस्त्र मूल्य साखळीतील शाश्वतता आणि परिपूर्णता लक्षात घेत वापरानंतरच्या वस्त्रांचे सुयोग्य व्यवस्थापन करणारा हा प्रकल्प टाकून दिलेल्या कपड्याचे मूल्यवान उत्पादनामध्ये रूपांतर करत असून याद्वारे स्थानिक कारागीरांना व त्यातही प्रामुख्याने महिलांना शाश्वत रोजगार उपलब्ध होत आहे. या प्रकल्पांतर्गत टाकाऊ वस्त्रांचे संकलन करण्याकरिता पहिल्या टप्यात नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २५० सोसायट्यांमध्ये जुने कपडे संकलन करण्याकरिता पेट्या ठेवण्यात येणार असून महानगरपालिकेच्या पुढाकाराने एस.बी.आय. फाउंडेशन लि. यांच्या मदतीने व टिसर आर्टिसन ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेमार्फत एकुण ४७ सोसायट्यांमध्ये स्वतंत्र ४९ पेट्या ठेवण्यात आल्या आहेत. उर्वरित पेट्या टप्याटप्प्याने इतर सोसायट्यांमध्ये ठेवण्यात येत आहेत. लवकरच महानगरपालिका मुख्यालयासह आठही विभाग कार्यालये व नमुंमपा शाळांमध्ये देखील या पेट्या ठेवण्यात येणार आहेत.

टाकाऊ वस्त्राचे संकलन करणेकरिता स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात आली असून शहरात विविध ठिकाणी असलेले थ्री आर सेंटर्स व ४७ सोसायट्यांमधून सद्यस्थितीत टाकाऊ वस्त्र संकलीत करण्यात येत आहे. बेलापूर येथील शकुंतला महाजन बहुउद्देशीय इमारत, सेक्टर २, सीबीडी बेलापूर या ठिकाणी संकलित वस्त्रावर पुढील प्रक्रिया करण्याकरिता टाकाऊ वस्त्र प्रक्रिया केंद्र उभारण्यात आले आहे.टिसर आर्टिसन ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने चांगल्या स्वरुपातील टाकाऊ वस्त्रांचे विलगीकरण करून हॅन्डलूमच्या सहाय्याने अप - सायकलींग करण्यात येत आहे. या प्रक्रियेत टाकाऊ कपड्यापासून विविध प्रकारच्या वस्तूंची पुनर्निर्मिती करण्यात येत आहे. तयार करण्यात आलेल्या वस्तूंचे बाजारपेठेत प्रदर्शन करण्यात येणार असून त्यांची विक्री ही करण्यात येणार आहे. यामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचतगटांची मदत घेतली जाणार आहे. यामध्ये नागरिकांनी आपले पँट, शर्ट, जॅकेट, मोजे, पायजमे, स्कर्ट, ड्रेस, शॉर्टस, ब्लाऊज, पुरुषांचे शर्ट तसेच लहान मुलांचे कपडे त्याचप्रमाणे चादरी, स्वच्छतेसाठी वापरण्याचे टॉवेल सारखे कपडे, ब्लँकेट, बेड स्प्रेड्स, रजई, कंफर्टर, पडदे अशी वस्त्र सामग्री द्यावी. तथापि अस्वच्छ किंवा दूषित कपडे व वस्त्र सामग्री, वैद्यकीय वापराचे कपडे, सॅनेटरी पॅड, गाद्या, लेदर पर्स, पादत्राणे, बेल्ट, औद्योगिक कापड, अंतर्वस्त्रे देऊ नयेत असे सूचित करण्यात येत आहे.

हा प्रकल्प राबविल्याने नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी जाणाऱ्या कचऱ्याचा भार काही अंशाने कमी होत असून कचरा कमी करण्याप्रमाणेच महिलांना रोजगारही उपलब्ध होत आहे. वापरानंतरच्या वस्त्रांचे व्यवस्थापन करण्याचा अभिनव प्रकल्प राबविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची देशातून निवड करण्यात आली असून या अभिनव प्रकल्पाची प्रशंसा या क्षेत्रातील तज्ञांनी केली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव अंशू सिन्हा यांनी आज या प्रकल्पाची पाहणी करतांना हा प्रकल्प क्षेपणभूमीवर जाणारा कापडाचा कचरा कमी करुन त्या कपड्यावर पुनर्प्रक्रिया करीत त्यामधून कचऱ्याचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी बहुमोल योगदान देणारा असल्याचे अभिप्राय दिले.

# थोडक्यात

## सरपंच, ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करा, अन्यथा आत्मदहन करण्याचा इशारा

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.२४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथून जवळच असलेल्या मौजे अर्जापूर ता.बिलोली जि.नांदेड या गावात ग्रामपंचायत सदस्य साईनाथ शेट्टीवार या तरुणाने जि.प. समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. ग्रामपंचायत कार्यालय अर्जापूर येथील सरपंच सिद्धार्थ नागोराव पतंगे तत्कालीन ग्रामसेवक सतीश फुलारी हे दोघे संगणमत करून दलित वस्तीचा निधी दलित वस्तीत वापर न करता इतर ठिकाणी करण्यात आला. असे ग्रामपंचायत सदस्य साईनाथ शेट्टीवार यांनी निवेदनाद्वारे दिले आहे. सामाजिक न्याय यांचे अहवाल व गट विकास अधिकारी यांचे अहवाल असताना सुद्धा उप मुख्यकार्यकारी अधिकारी कापसे यांनी सुनावणी घेतली होती. त्या सुनावणीमध्ये सुनावणीच्या अहवालामध्ये सरपंच व ग्रामसेवक हे दोषी आढळून आलेले आहे. तरीही दि.०४/०२/२०२५ रोजी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र दिलेले असताना देखील आजपर्यंत सरपंच व ग्रामसेवकावर कारवाई झालेली नाही. दलित वस्ती सुधारणा अंतर्गत आलेला निधी अन्य ठिकाणी वापरला जात असून त्यामुळे मूळ दलित वस्तीमध्ये राहणाऱ्या नागरिकांवर अन्याय होत असल्याची तक्रार ग्रा.पं. सदस्य साईनाथ शेट्टीवार यांनी जिल्हा परिषदेला निवेदनाद्वारे केली आहे. ही अतिशय गंभीर बाब असून ज्या लाभार्थ्यांसाठी शासनाने जी योजना निर्माण केली आहे. त्या लाभार्थ्यांच्या संदर्भात त्यांचे जीवनमान त्यांचे राहणीमान व त्यांच्याकडे असलेल्या अडीअडचणी व त्यांचा संपूर्ण समाजामध्ये एक दर्जा वाढावा.

या दृष्टिकोनातून शासन त्या भागामध्ये निधी देत असतो. परंतु त्याचा दुरुपयोग अशा पद्धतीने सत्ताधारी आणि प्रशासन करीत असेल तर ते चुकीचे आहे. तरीही मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे की, या दोघांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे. जि प ने या दोघांना दिनांक २९ मे २०२५ रोजी पर्यंत सरपंच व ग्रामसेवक या दोघांवर कारवाई न केल्यास दिनांक ३० मे २०२५ रोजी आपल्या कार्यालयात आत्मदहन करणार असा इशारा मौजे अर्जापूर येथील ग्रा.पं.सदस्य साईनाथ शेट्टीवार या तरुणांनी दिला आहे. यास संपूर्ण जिल्हा परिषद जबाबदार राहील असे लेखी निवेदन त्यांनी जि.प. ला दिला आहे.

## वादळी वाऱ्याचा कहर; मान आश्रम शाळेचे पत्रे उडाले, लाखोंचे नुकसान

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२४, विक्रमगड (पालघर) :** पालघर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी वादळी पावसाने अनेक भागात नुकसान केले आहे. विशेषतः विक्रमगड तालुक्यातील अनुदानित मान आश्रम शाळेवर शुक्रवार, दिनांक २३ मे २०२५ रोजी अचानक आलेल्या वादळाने थेट हल्ला चढवला. या वादळी वाऱ्यामुळे शाळेच्या इमारतीवर असलेली पत्रे उडून गेली असून, लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. सदर शाळा जव्हार आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येते. वादळाच्या तडाख्यामुळे शाळेच्या परिसरातील अनेक झाडे उन्मळून पडली. यातील काही झाडे थेट इमारतीवर कोसळली, त्यामुळे छपरावरची पत्रे उडाली आणि काही ठिकाणी भिंतींनाही तडे गेले आहेत. शाळेची संपूर्ण इमारत आणि विद्यार्थ्यांचे निवासी वसतिगृह यावर याचा गंभीर परिणाम झाला आहे.

सध्या शाळा उन्हाळी सुट्टीसाठी बंद असली तरी १५ जूनपासून शाळा पुन्हा सुरु होणार आहे. मात्र या नुकसानीमुळे विद्यार्थ्यांना राहण्याची आणि शिकण्याची मोठी गैरसोय निर्माण होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ही आश्रम शाळा निवासी असून, आदिवासी भागातील गरीब व दूरवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि निवास या दोन्ही गोष्टींसाठी ही शाळा महत्त्वाची आहे. शाळेचे प्राथमिक मुख्याध्यापक रमेश माळी यांनी नुकतेच घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी शाळेचे नुकसान संस्था संचालकांना कळवले असून, या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, त्यांनी समाजातील सामाजिक संस्था, स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

**शाळेच्या पुर्नबांधणीसाठी मदतीची गरज -**

या आश्रम शाळेचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान लवकर भरून न निघाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी तात्काळ लक्ष घालून आवश्यक निधी आणि साहित्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शाळेच्या पुर्नबांधणीसाठी शासकीय मदतीबरोबरच स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समाजसेवकांनीही हातभार लावण्याची गरज आहे.

# सर्वसामान्य नागरिकांकरीता शासन आपल्या दारी - आ.देवतळे

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेतीचे वाटप; राज्यातील पहिला उपक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, वरोरा (चंद्रपूर) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने अनेक जनहिताचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांचा थेट लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळत आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुलासाठी शासना कडून मोफत रेती देणार असल्याची घोषणा केली होती. आज ती घोषणा प्रत्यक्षात आली असून वरोरा येथून याची सुरुवात होत असल्याचा मला खूप आनंद झाला असे आमदार करण देवतळे यांनी आयोजित वाटप उदघाटन वेळी सांगितले. शासनाच्या या निर्णयामुळे अनेक गरजू आणि गरीब कुटुंबांना आपले हक्काचे घर उभारताना मोठा दिलासा मिळणार आहे. सर्वसामान्य नागरिक हा शासनाच्या प्रत्येक योजनेचा केंद्रबिंदू आहे, असेही आमदार देवतळे यांनी सांगितले.

आ. देवतळे यांच्या उपस्थितीत तुळाना १ ह्या रेती घाटावरून लाभार्थ्यांना रेती वितरित करण्यात आली. एका लाभार्थ्याला पाच ब्रास प्रमाणे रेती दिली जात आहे. या कार्यक्रमात आ. देवतळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रेतीचे ट्रॅक्टर रवाना करण्यात आले.

याप्रसंगी लाभार्थी नागरिकांना रेतीच्या टीपीचे ही वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. वरोरा तालुक्यात जे घाट घरकुल लाभार्थ्यां करीता राखीव करण्यात आले आहे त्याच घाटातील रेती चे टीपी देण्याचे आदेश देण्यात आली असून तुळाना एक, मारडा, खैरगाव सालोरी, केळी, कोसरसार बोपापुर व पवनी इत्यादी घाट तालुक्यातील ठरवून देण्यात आले आहे.

रॉयल्टी दिल्यानंतर सकाळी सहा ते सायंकाळी सहा पर्यंत लाभार्थ्यांनी रीतीची उचल करावी लागेल रेती उचल करण्यापूर्वी लाभार्थ्याला अर्ज करावे लागेल व त्याचबरोबर स्वयंघोषणापत्र भरून दिल्यानंतर त्यांना मोफत टीपी दिल्या जाईल असे तहसीलदार योगेश कौटकर यांनी सांगितले. कार्यक्रमास तहसीलदार योगेश कौटकर, नायब तहसीलदार बोरुडे, संवर्ग विकास अधिकारी मुंडकर, अमोल आखाडे यांची उपस्थिती होती. सध्या रेती घाटांचे लिलाव थांबलेले असल्याने घरकुल मंजूर होऊन ही घराचे बांधकाम रखडले होते. त्यामुळे अनेक आमदारांनी शासनाचे लक्ष वेधले होते.



शासनाच्या या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. आजच्या कार्यक्रमात प्रत्येक लाभार्थ्याला पाच ब्रास प्रमाणे रेती दिली जात आहे. ही रेती शासनाच्या नियमानुसार आणि पारदर्शक पद्धतीने घाटावरून मोफत दिली जात आहे. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांचा खर्च कमी होणार असून गरजू नागरिकांना मोठा आधार मिळणार आहे.

तालुक्यातील ४ हजार लाभार्थ्यांना आठ रेती घाटांवरून रेती दिली जाणार आहे. शासनाची ही योजना म्हणजे गरजूंना मदतीचा हात देण्याचा एक चांगला उपक्रम आहे. आजचा दिवस वरोरा व भद्रावती तालुक्यातील गरजूसाठी महत्त्वाचा असून शासनाच्या घरकुल योजनेतून आपले घर उभारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अनेक कुटुंबांसाठी ही मोठी संधी आहे. 'घरकुल योजना' फक्त एका घरापुरती मर्यादित नाही, तर ती कुटुंबाचे भविष्य घडवते. स्वताचे घर म्हणजे स्वाभिमान, सुरक्षितता आणि स्थैर्याचे प्रतीक आहे. घरकुल म्हणजे चार भिती नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाची स्वप्नपूर्ती आहे. त्यामुळे हे घर उभे राहण्यासाठी शासनाने आपली साथ देणे ही जबाबदारी आहे. शासन गरजूंच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. असे यावेळी आमदार करण देवतळे यांनी सांगितले.

# राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आता ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया; शिक्षण विभागाचा निर्णय

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२५, ठाणे :** राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आता ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया होणार आहे. अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला सोमवार, २६ मे २०२५ पासून होणार सुरुवात होणार असून राज्यात पहिल्यांदाच इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने पहिल्यांदाच अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवली आहे.

यावर्षी सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये लाखो जागा उपलब्ध आहेत यापूर्वी पुणे व पिंपरी चिंचवड यांसह मुंबई, ठाणे, कोल्हापूर जिल्ह्यातील पालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात होती. यंदा जिल्हास्तरावरील महाविहालयांमध्येही ऑनलाइन प्रवेश राबविली जाणार आहे. त्यामुळे ऑनलाइन प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

**पसंतीक्रमानुसार प्रवेश मिळणार -**

अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करताना विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त १० पसंती क्रम लावायचे आहेत. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या महाविद्यालयाच्या पसंतीक्रमानुसार विद्यार्थ्यांना ॲडमिशन मिळणार आहेत.

**'कॉलेज-ट्युशन टायअप'ला ब्रेक**

अकवीची सर्व ॲडमिशन प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडणार असून, ऑफ लाईन प्रवेश बंद केले आहेत.

त्यामुळे इंटिमेटेड कॉलेजची कातेदारी बंद होणार आहे. ३ जूनपर्यंत नोंदणी करणे अनिवार्य यंदा अकरावीच्या प्रवेशासाठी २६ मे पासून विद्यार्थी नोंदणी प्राधान्यक्रम निश्चितीसह प्रत्यक्ष अर्ज प्रक्रिया सुरू होणार असून ३ जून पर्यंत विद्यार्थ्यांनी नोंदणी करायची आहे.

५ जून रोजी तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात येणार आहे.

- **कुठल्या पोर्टलवर नोंदणी कराल ?**

अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना महाएफवायजेसी ॲडमिशन डॉट इन या वेबसाइटवर प्रथम नोंदणी करावी लागणार असून त्यानंतर प्रवेशासाठी अर्ज भरावा लागणार आहे. विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा नसेल ते दुसऱ्या फेरीत अर्ज करू शकतात. मात्र, पसंतीच्या मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश न घेतल्यास विद्यार्थ्यांना पुढील फेऱ्यांमध्ये अर्ज करता येणार नाही. विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्यावर यूजर आयडी आणि पासवर्ड स्वतः जवळ ठेवावा. कोणालाही शेअर करू नये.

**मनोज महाजन, उक्ष पुरोगामी शिक्षक संघटना, महाराष्ट्र**

## कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशनचा उपक्रम; डिजिटल शेती शाळा

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२३, बुलडाणा :** शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत शेती पद्धती, जलसंधारण आणि उत्पादनवाढ यासाठी कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल शेती शाळा हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी सक्रियपणे सहभाग घेऊन शेतीत नवे तंत्र आत्मसात करून अधिक उत्पादनक्षम व पर्यावरणस्नेही शेतीकडे वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे. या उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, हवामान बदलाचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, सेंद्रिय खतांचा वापर आणि पाण्याचा शाश्वत वापर याबाबत प्रशिक्षण देणे हा आहे.

डिजिटल माध्यमातून उपलब्ध असलेल्या या प्रशिक्षणामुळे शेतकरी घरबसल्या ज्ञान घेऊ शकतील व आपल्या शेतीमध्ये सकारात्मक बदल घडवू शकतील. डिजिटल शेती शाळा उपक्रमाबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा www.digitalkhetishala.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.